

# -: श्री. संत सखुबाई :-

आपल्या शुद्ध भक्तीने इतकी आर्त हाक मारावी की साक्षात पांडुरंगही आपल्यासाठी बांधला जावा.. हा अधिकार ज्यांचा होता त्या 'संत सखूबाई'!

सखूबाईंचा जन्म आणि कार्यकाळ अनिश्चित असला तरीही ढोबळमानाने १७९० च्या आधी २२५ वर्षे म्हणजे साधारण १५६५ दरम्यान त्यांचा कार्यकाळ मानला जातो. सखू ही शिखर शिंगणापूरच्या पुजाऱ्यांची नात. सखूचे वडील गेल्यावर ही मंडळी कृष्णातीरी वास्तव्यास आली. सखूचं लग्न कराडच्या गिजरे यांच्याशी झालं होतं. सखूचा स्वभाव हा अत्यंत प्रेमळ, शांत, समजूतदार होता. पण तिच्या सासू-सासऱ्यांचा आणि नवऱ्याचा स्वभाव हा अत्यंत कपटी, दुराभिमानी, दुष्ट आणि रागीट होता. सखूला या सगळ्यांकडून अत्यंत हालअपेष्टा, शारीरिक व मानसिक छळ सहन करावा लागत असे. पण तरीही "सुखासुखी आयुष्यात आपण भगवंताला आठवत नाही. तो त्याची आठवण सतत रहावी यासाठी दुःख देतो" असे त्या म्हणत आणि हसतमुखाने संसाराची कर्तव्ये पार पाडत.

एके दिवशी नेहमीप्रमाणे रोजची कामे करण्यासाठी त्या कृष्णेवर गेल्या. तिथे त्यांना दुरून दिंडी येताना दिसली. विठूरायाच्या नामात आणि टाळ-मृदुंगाच्या गजरात त्या इतक्या तल्लीन होऊन गेल्या की कोणाला काही न सांगताच त्या दिंडीसोबत पुढे गेल्या. ही बातमी जेव्हा त्यांच्या सासरी कळली तेव्हा त्यांच्या नवऱ्याने आणि सासुबाईंनी त्यांना ओढत

आणून घरात बांधून ठेवले. त्यांचे मन मात्र विठ्ठलापाशीच होते. मनोमन त्यांनी विठ्ठलाला आर्त हाक मारली, "विठ्ठला, मला आपल्या पायाचे दर्शन घ्यायचे होते पण आता ते कसं शक्य आहे? तुम्हीच माझे आई-वडील आहात. मी जशी बरी-वाईट आहे, तुमचीच आहे. मला मरण आलं तरी चालेल पण मला तुमचं दर्शन व्हावं ही इच्छा पूर्ण करा." इतक्या आर्त हाकेला भगवंताने उत्तर दिले नाही असे शक्यच नाही. साक्षात विठ्ठल सखूबाईंचंच रूप घेऊन तिथे आला, स्वतःला सखूच्या जागी बांधून घेतलं आणि सखूबाईंना पंढरपूरला पोचवलं. काय आश्चर्य आहे ना! जो भगवंत सर्वांना बंधपाशातून मुक्त करतो तो आज स्वतःच आपल्या भक्तासाठी बांधला गेला होता. पुढे सखूबाई पंढरपुरात परमेश्वराच्या ध्यानात इतक्या रममाण झाल्या की तिथेच त्यांची समाधी लागली.

सखूबाईंबद्दलची माहिती, त्यांचे अभंग फार प्रचलित नाहीत. पण त्यांचं चरित्र हे निर्मळ, निरागस भक्तीचं जणू एक मूर्तिमंत उदाहरणच आहे.

- कु. आर्या निलेश फणसळकर.

व्यक्तिरेखा -

१. विठ्ठल - श्री. सुर्यकांत कुलकर्णी.

२. संत सखुबाई - कु. कल्याणी बोरकर.

नेपथ्य -

१. श्री. शंतनू देशमुख.
२. श्री. अद्वैय मुंढे.
३. श्री. गिरीश कुलकर्णी.
४. श्री. गणेश गायकवाड.
५. श्री. आशुतोष गोळे.
६. श्री. के. एन. देसाई सर.
७. श्री. महेश पुजारी.
८. श्री. सारंग चव्हाण.

लोकेशन -

श्री. गणेश गायकवाड यांचे राहते घर, गायकवाड मळा, पश्चिम सुपने, कराड.

रंगभूषा -

श्री. गणेश सावंत.

वेशभूषा -

१. सौ. आसावरी पंडित.

२. श्री. गणेश सावंत.

छायाचित्रण -

श्री. कल्पेश पाटसकर.

लायटिंग विभाग -

१. श्री. गणेश गायकवाड.

२. श्री. आशुतोष गोळे.

३. श्री. सर्वेश उमराणी.

४. श्री. अद्वैय मुंढे.
५. श्री. शंतनू देशमुख.
६. श्री. महेश पुजारी.

फोटो एडिटिंग -

१. श्री. राजेंद्र बिळासकार.

चित्र (स्केच) -

१. अद्वैय मुंढे.

लेखन विभाग -

- लेखन विभाग प्रमुख - श्री. राजेंद्र आलोणे.
- लेखन - कु. आर्या निलेश फणसळकर.
- लेख संकलन -

  -श्री. दीपक आफळे.
- ध्वनीमुद्रण - सौ. अवंती कुलकर्णी.
- ध्वनिमुद्रिका -